# निशाणी १ वरील आदेश

दावा परिच्छेद क्र. २ मध्ये वादी हे मयत रसमांचे वारस असल्याचे नमुद असून वादी क्र. १ ते ६ हे मयत वसंत यांचे, वादी क्र. ७ ते १३ हे मयत प्रभाकर यांचे तर वादी क्र. १२ ते १४ हे मयत चंद्रभागा यांचे वारस असल्याचे नमुद केले आहे. दावा तयार करते वेळी वादी यांनी वादींचे क्रमांक दावा कलम २ मध्ये शक्यतिया नमुद करण्याची काळजी घेतली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे मयत वादींचे पुर्वज यांचे वारस नक्की वादी क्रमांक किती होते याबाबत साशंकता निर्माण होते.

त्याचप्रमाणे दाव्यात कलम ८ व ११ मध्ये वादींनी खरेदीखत क्रमांक १३६२/२०१० चा उल्लेख केला असला तरी मागणी परिच्छेद क्रमांक १६) अ) मध्ये वादी यांनी खरेदीखत दस्त क्र. १३६२/२००६ असा उल्लेख केला आहे. दाव्यातील वादींची मागणी ही दाव्यातील कथनांशी सुसंगत असणे आवश्यक असते. परंतु इथे तसे झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वादी यांनी दाव्याशी संतुलित मागणी केल्याचे दिसून येत नसून त्याबद्दल देखील साशंकता निर्माण होते.

म्हणून वादी यांना निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी वर नमुद त्रुटी दुर करण्याच्या दृष्टीने योग्य ती पाऊले उचलावीत, अन्यथा कायद्याप्रमाणे पुढील योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील.

वरील आदेश हे नैसर्गिक न्यायतत्वांच्या अधीन राहून देण्यात येत आहेत.

(Sd/-)
18/2024
०३/०२/२०२४

2nd Jt. CJJD & JMFC.
Kolhapur.